# प्रकरण - ६

## प्रकरण ६

# समारोप व शिफारसी

भारतीय लोकशाही ख-या अर्थाने यशस्वी होण्यासाठी समतेचे तत्त्व प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच भारतीय घटनेने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. परंतु भारतासारख्या विकसनशील देशामधील जात-पात, धर्म, वंश, अशा भेदभावाच्या विघातक प्रथामुळे समाजात समतेची संकल्पना स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात ही अपेक्षेप्रमाणे साकार झालेली नाही.

जातीउपजातीनी विभागलेल्या या समाजात उच्चवर्गीयांचे वर्चस्व अबाधित राहिले, समाज हा स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भेदभावाने विभागला गेला. आणि या दोन्ही समाजातील अंतर हे वाढतच गेले. उच्चवर्गीयांची मक्तेदारी ही समाजात अजूनही आहे. समाजातील खालच्या वर्गाची कामे ही अस्पृश्यांच्या वाट्याला आली. कोणत्याही प्रकारचे अधिकार, स्वातंत्र्य हे त्यांना पुरेशा प्रमाणात मिळाले नाहीत. शिक्षण, आर्थिक स्थैर्य, सामाजिक सहभाग, राजकीय सहभाग आणि त्यांचा सामाजिक दर्जा याबाबतीत त्यांना पुढारलेल्या समाजाप्रमाणे बरोबरीचे स्थान अजूनही मिळाले नाही. किंबहुना व्यक्तीची ओळख ही त्यांच्या जाती, व्यवसायावरूनच होत आहे. जातीय दंगली, जातीय हिंसाचार यातच आजचा समाज जखडलेला आहे. समाजात परिवर्तन व बदल घडवून आणण्यासाठी, आधुनिक समाजनिर्मितीसाठी या अस्पृश्यांना (मागासवर्गीय) विकासाची संधी उपलब्ध करून देणे स्वाभाविक आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय शासन मागासवर्गीयांसाठी विकासात्मक संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु याला पुरेपूर यश अजूनही मिळाले नाही.

महाराष्ट्र शासनाने दि. १ मे १९८३ रोजी अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी समाजकल्याण विभाग या स्वतंत्र विभागाची निर्मिती केली. प्रत्येक जिल्हा व ग्रामस्तरावरील अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमातीतील लोकसमूहाच्या कल्याणास्तव अंमलबजावणीसाठी ही प्रशासन व्यवस्था सुरू करण्यात आली. या अंतर्गतच शासनाने अनुसूचित जाती जमातीचा सर्वांगीण विकास ह्या उद्दिष्ट

पूर्ततेकरिता विकासात्मक महामंडळे ही निर्माण केली. आणि त्यांच्या विविध कल्याणकारी योजनाची अंमलबजावणीही करण्यात येऊ लागली.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी शासकीय विकास महामंडळे भूमिका व कार्य यामध्ये विकासात्मक महामंडळांच्या योजना कार्यक्रम यांची अंमलबजावणी कशा पध्दतीने केली जाते याचा अभ्यास करत असतानाच जिल्हास्तरावरील या विकासात्मक महामंडळाची प्रशासकीय संघटना, उद्दिष्टे यांची कार्यपध्दती यांचा अभ्यास केलेला आहे. यासाठी कोल्हापूर जिल्हा हा व्यष्टी अध्ययनासाठी निवड केली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणात प्रस्तावना मांडलेली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी शासकीय विकास महामंडळे याअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जाती जमातीची लोकसंख्या, त्यांच्याकरिता महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेले विकासात्मक महामंडळ, त्यांची वैशिष्ट्ये, उद्दिष्टे, तसेच विकासात्मक महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची जबाबदारी, काही नामवंत तज्ञांनी केलेल्या विकासात्मक महामंडळाच्या व्याख्या यांचे विश्लेषण केलेले आहे.

शोधनिबंधाच्या दुस-या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्हा एक दृष्टिक्षेप या शीर्षकाखाली या जिल्हयाच्या भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा मागोवा घेतलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील नैऋत्य पठारी भागावर येणारा कोल्हापूर जिल्हा आर्थिकदृष्ट्या प्रगत गटात मोडत असला तरी या जिल्हयाला एक विशिष्ट असा ऐतिहासिक वारसा लाभलेला असून स्वातंत्र्य चळवळीतही या जिल्हयाचे चांगलेच योगदान आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा लाभलेल्या जिल्हयाला सर्वकष परिवर्तनाचा एक उज्ज्वल असा इतिहास लाभलेला आहे. या जिल्हयात स्वातंत्र्योत्तर काळातही काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्रभावी रित्या आहे. काँग्रेस पक्षाव्यतिरिक्त काही प्रमाणात जनसुराज्यशक्ती पक्ष, सध्या राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्ष यांचे वर्चस्व या जिल्हयाला लाभलेले आहे. या जिल्हयाला अलीकडील लाभलेले राजकीय, सामाजिक व आर्थिक नेतृत्त्व विकासाच्या दृष्टीनेच कार्य करीत आहे. जिल्हयाची महानगरपालिका ही जिल्हयाच्या

प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आणि जिल्हयाची विकासाच्या दृष्टीने वाटचाल घडवून आणण्यासाठी पाऊल उचलत आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक परिस्थिती असे दर्शविते की, विशेषत: मागासवर्गीयांचा दर्जा हा दुय्यम स्वरूपाचा आहे. याला कोल्हापूर जिल्हाही अपवाद नाही. जिल्हयाच्या समाजकल्याण विभागाद्वारे मागासवर्गीयासाठी राबविणा-या अनेक कल्याणकारी योजनाचे सूक्ष्म परीक्षण केलेले आहे. परंतु आजही समाजातील अज्ञान, निरक्षरता, अंधश्रध्दा, राजकीय आणि आर्थिक मागासलेपणा यामुळे या समाजाची अनेक कुटुंबे दारिद्र्यरेषेअंतर्गतच जीवन जगत आहेत.

प्रकरण तीन मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी शासकीय विकास महामंडळे (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ) अनुसूचित जाती जमातीतील दारिद्रयरेषेअंतर्गत जीवन जगत असणा-या लोकसमुहाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास मदत करणा-या वरील महामंडळांचा सविस्तर अभ्यास केला आहे. पाचही विकासात्मक महामंडळे ही ज्या त्या लोकसमुदायातील लाभधारकांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रत्येक विकासात्मक महामंडळाच्या उद्दिष्टाबाबत थोड्याफार फरकाने सारखेपणा जाणवत असला तरी उद्दिष्ट साध्यतेबाबत राबविण्यात येणा-या योजना, कार्यक्रम आणि लाभधारक घटक कोणते आहेत यांचाही अभ्यास केलेला आहे. विकासात्मक महामंडळाला उद्दिष्ट साध्यतेकरीता कोणते अधिकार प्राप्त झाले आहेत, त्यांची कार्य प्रक्रिया कशा पध्दतीने चालते शिवाय या विकासात्मक महामंडळाची ध्येयधोरणे ठरविण्याचा त्यांना मार्गदर्शन करण्याचा अधिकार कोणत्या घटकाला प्राप्त झाला आहे या बाबीचा अभ्यास सदरच्या प्रकरणात केला आहे.

विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल, त्यातील वाढ ह्या बाबींचा खुलासाही आकृती क्रमांक च्या माध्यमाने स्पष्ट करण्यात आला आहे. विकासात्मक महामंडळाला आपले कार्य कोणत्या घटकांच्या नियंत्रणाखाली पार पाडावे लागते,

कोणकोणत्या घटकांना जबाबदार रहावे लागते या सर्व बाबींचा खुलासा हा या प्रकरणामध्ये केलेला आहे. जिल्हयातील विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांचे अधिकार पाहता त्यांना आपल्या कार्यालयीन अधिकारात वाढ मिळणे गरजेचे आहे असे वाटते. जेणेकरून त्यांना कार्यालयीन गतिशीलता ही साधता येईल.

प्रकरण चार मध्ये विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजना, कार्यक्रम यांचे विश्लेषण व परीक्षण करण्यात आले असून या योजनेअंतर्गत लाभधारकांना देण्यात येणारे अनुदान, बीज भांडवल, प्रशिक्षण आणि नोंदणीकृत सहकारी संस्थाचे भागभांडवल खरेदीकरिता आर्थिक मदत यांचा अभ्यास केलेला आहे. यातील अनुदान, बीज भांडवल, प्रशिक्षण या सेवा राज्य पातळीवरील विकासात्मक महामंडळामार्फत दिल्या जातात तर उर्वरित शैक्षणिक अर्थसहाय्य, महिलांकरिता आर्थिक मदत,. मोठ्या रक्कमेचे अर्थसहाय्य आणि दीनदुबळ्यांसाठी आर्थिक मदत ह्या सेवा राष्ट्रीय स्तरावरील विकासात्मक महामंडळामार्फत लाभधारकांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. प्रस्तुत प्रकरणात असे आढळले की, राज्यपातळीवरील विकासात्मक महामंडळाने लाभधारकांना (बँकेने प्रलंबीत केलेल्या अर्जाव्यतिरिक्त) विना व्यत्यय लाभ उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे लाभधारकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचे चित्र पाहवयास मिळते. विकासात्मक महामंडळाच्या योजना आणि प्रशासकीय संघटनाद्वारे मागासवर्गीयांचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकास होऊन समाज विकास साधला जातो असा निष्कर्ष जिल्हयातील विकासात्मक महामंडळांच्या कार्यपध्दतीच्या अभ्यासातून स्पष्ट झालेला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना व कार्यक्रमांचा विचार केला असता या योजना व कार्यक्रम हे लाभधारक, महिला, विद्यार्थी आणि विशेषत: अपंग लाभधारक यांच्याकरिता अत्यंत उपयुक्त ठरल्या. मात्र विकासात्मक महामंडळाने या योजनांच्या वसुलीबाबत उदासिनता दर्शविले असे अभ्यासातून स्पष्ट होते. विकासात्मक महामंडळ राष्ट्रीय स्तरावरील योजनांच्या अंमलबजावणीचे कामही मंदगतीने कार्यान्वित करीत असल्याचे अभ्यासातून निदर्शनास आले.

विकासात्मक महामंडळाच्या तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण या योजनेचा लाभ जिल्हयातील १३५२ लाभधारक विद्यार्थ्यांनी घेतला तर सफाई कामगारांच्या कुटुंबियांसाठी प्रशिक्षणातंर्गत ३३४ लाभधारक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. तसेच तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे ब-याच लाभधारकांनी नोकरी अथवा स्वयंरोजगार उभा करून मिळकतीचा कष्टार्जित मार्ग स्वीकारल्याची कबुली जिल्हा व्यवस्थापकांच्या चर्चेद्वारे स्पष्ट झाली. शिवाय लाभधारक विद्यार्थ्यांचा कल आधुनिक परिस्थितीत अत्यावश्यक ठरत असलेल्या संगणक प्रशिक्षणाकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हयातील सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था यांच्याद्वारेही लाभधारकांना लाभ उपलब्ध करून देण्याचे काम विकासात्मक महामंडळ करीत आहे. याअंतर्गत युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी या स्वयंसेवी संस्थेला महामंडळाने रु. ५,००,०००/- देवू केले आहेत. तर या स्वयंसेवी संस्थेने २५ लाभधारकांना रु. २०,०००/- चा लाभ उपलब्ध करून दिला. यावरूनच असे लक्षात येते की, विकासात्मक महामंडळ हे वैयक्तिकरित्या पात्र लाभधारकांना अथवा स्वयंसेवी संस्थामार्फत लाभधारकांना लाभ उपलब्ध करून देण्यास, आणि लाभ पोहचविण्यास तत्पर आहे. म्हणजेच विकासात्मक महामंडळ हे उद्दिष्ट पूर्ततेसाठी सतत प्रयत्नरत आहे म्हणायला हरकत नाही.

जिल्हयातील पाचही विकासात्मक महामंडळाचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करता असे लक्षात येते की, विकासात्मक महामंडळाच्या योजना व कार्यक्रम हे सारखेच दिसून आले तर प्रत्येक महामंडळाचे लाभधारक घटक वेगवेगळे आहेत. यावरूनच विकासात्मक महामंडळानी लाभधारक घटकांच्या विशिष्ट गरजाकडे विशेष लक्ष देवून योजना व कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे गरजेचे आहे. तसेच त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी पाचही महामंडळानी त्यांचा आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत समन्वय साधल्यास कार्यक्रम अधिक उपयोगी आणि यशस्वी होतील.

प्रकरण पाच मध्ये विकासात्मक महामंडळाचे दुर्बल घटकासाठी योगदान यामध्ये प्रत्येक विकासात्मक महामंडळे ही आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी सतत प्रयत्नरत आहे. विशेषत: महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाने आपल्या योजना व कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीने जिल्हयातील ३०,३५९ लाभधारकांना

स्वयंरोजरागार उपलब्ध करून दिला आणि उद्दिष्ट साध्यतेबाबत इतर महामंडळापेक्षा या महामंडळाने गती प्राप्त केली हे स्पष्ट आहे. प्रशिक्षण योजनेच्या उद्दिष्ट साध्यतेबाबत मात्र विकासात्मक महामंडळांना म्हणावे तसे यश प्राप्त झाले नाही. आधुनिक काळातील सुशिक्षित बेरोजगार किंवा किमान शिक्षणाधारी विद्यार्थ्यांना तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण हे स्वावलंबी जीवनाचा मार्ग दाखवणारे प्रशिक्षण असल्याने विकासात्मक महामंडळानी यावर अधिक भर देणे गरजेचे आहे. तसेच विकासात्मक महामंडळांच्या राष्ट्रीय स्तरावरील योजनांच्या उद्दिष्ट साध्यतेबाबतही अधिक लाभार्थ्यांना लाभ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

सदरच्या प्रकरणात विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभधारकांची मुलाखत आणि विकासात्मक महामंडळाच्या योजना व कार्यक्रमाविषयीची प्रतिक्रिया जाणून घेतली असता असे लक्षात येते की, विकासात्मक महामंडळांनी लाभधारकांना संधी उपलब्ध करून दिली, पण त्यासाठी आवश्यक सुविधा म्हणजे वीज, मध्यवर्ती ठिकाणी गाळे, अधिक रक्कमेचे भांडवल उपलब्ध करून देवू शकले नाही. त्यामुळे लाभधारकांना लाभानंतरही अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. तरीही काही लाभधारकांना व्यवसाय किफायतशीर ठरला आहे आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीतही समाधानकारक सुधारणा झाल्याचेही निदर्शनास आले. विकासात्मक महामंडळाचे कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी खालीलप्रमाणे काही सूचना करण्यात आल्या आहेत.

१. अधिकाधिक लोकसमुदायापर्यंत विकासात्मक महामंडळाविषयीची माहिती पोहचावी म्हणूनच शासनाने विशेष प्रयत्नावर भर म्हणून विकासात्मक महामंडळावर दृष्टिक्षेप टाकणारा स्वतंत्र लेख किंवा लघुपट निर्माण करून तो वृत्तपत्र, दूरदर्शन व आकाशवाणी यासारख्या प्रसारमाध्यमाद्वारा प्रसारित करावा. तसेच विकासात्मक महामंडळाच्या योजना व कार्यक्रम हे अधिकाधिक लोकाभिमुख बनवण्याकरिता शासनाने संबंधित शहरातील नगरपालिका व गावातील ग्रामपंचायती यांच्या मदतीने सभा संमेलनाचे आयोजन करावे.

२. विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्ज प्रकरणातील १० टक्के रक्कमेच्या सहभागात वाढ करून शासनाने अनुक्रमे ती ४५ टक्के इतकी करावी म्हणजेच सदरच्या कर्ज प्रकरणांना बँकांच्या मंजुरीबाबतचा चांगला प्रतिसाद लाभेल. तसेच या योजनांचा लाभही लाभधारकांच्यादृष्टीने अधिक फायद्याचा व किफायतशीर ठरेल.

३. जिल्हयातील प्रत्येक विकासात्मक महामंडळाच्या कार्यरत असलेल्या स्वतंत्र कार्यालयाप्रमाणेच शासनाने जिल्हयात महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचेही स्वतंत्र कार्यालय कार्यरत करावे म्हणजेच जिल्हयातील चर्मकार लोकसमुदायाची होणारी गैरसोयही टळेल. प्रसंगी विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व कार्यक्रमाच्या लाभावाचूनची वंचितताही त्यांना सहन करावी लागणार नाही. तर या लोकसमुदायाला हा लाभ विना व्यत्यय व विनाविलंब उपलब्ध करून घेता येईल.

४. पाठीवर बि-हाड घेऊन गावोगाव भटकंती करणारा, समाजापासून दुर्लक्षिला गेलेला हा विमुक्त व भटका समाज. वास्तविक अशा या समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनाने इतर विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेच्या अनुदानाप्रमाणेच ह्याही समाजाला महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेद्वारे अनुदान हे उपलब्ध करून दयावे.

५. विकासात्मक महामंडळानी योजना व कार्यक्रमाचा आराखडा आणि त्याबाबतचे नियम (अनुदान, कर्ज स्वरूप) हे तत्कालीन परिस्थितीनुरूप बनविले होते. परंतु सध्याची परिस्थिती पाहता तत्कालीन नियमानुसार स्वयंरोजगाराची उभारणी करणे लाभधारकांना अत्यंत कठीण बनले आहे. म्हणूनच शासनाने तत्कालीन नियमात बदल करून लाभधारकांना व्यवसायाच्या अनुषंगाने अधिक रक्कमेचे अर्थसहाय्य हे उपलब्ध करून दयावे.

६. विकासात्मक महामंडळाद्वारे लाभधारक प्रशिक्षणार्थीना देण्यात येणा-या ठराविक अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणामध्ये वाढ करून, सध्या अधिक मागणी असलेला हॉटेल मॅनेजमेंट, टुरिझम गाईड प्रशिक्षण, फायनान्स मॅनेजमेंट, फॅशन डिझायनिग, डिजीटल आर्टिस्ट, हस्तकला, आरोग्य सेवक, गृहसजावटकार आणि अंगणवाडी-बालवाडी प्रशिक्षण यासारख्या आधुनिक प्रशिक्षणाचा समावेश हा शासनाने प्रशिक्षण योजनेतंर्गत करावा. म्हणजेच लाभधारकांना बदलत्या परिस्थितीच्या अनुषंगाने प्रशिक्षण घेता येईल आणि स्पर्धेच्या युगात इतरांच्या बरोबरीने आपला विकास साधता येईल.

७. विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांना आपला व्यवसाय हा अधिक किफायतशीरपणे करता यावा म्हणून शासनाने स्वयंरोजगार उभारणीसाठी आवश्यक असलेली गावातील किंवा शहरातील मध्यवर्ती ठिकाणची जागा अथवा बाजारपेठातील जागा, गाळे हे ग्रामपंचायती किंवा नगरपालिका यांच्याद्वारे लाभधारकांना उपलब्ध करून द्यावी.

८. विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांनी उत्पादित केलेल्या मालाला (वस्तूला) शासनाने बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी किंवा शासनाने तो माल खरेदी करून विविध शासकीय संस्थांना किंवा कार्यालयाना पुरवावा म्हणजेच लाभधारकांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळेल आणि त्यांना आपला व्यवसाय अधिक किफायतशीरपणे करता येईल.

९. विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांना व्यवसायाची निवड, जागेची निवड, व्यवसाय उभारणी आणि व्यवसाय प्रभावीकारकरित्या करण्याची पध्दती, या बाबींच्या मार्गदर्शनाकरीता शासनाने विकासात्मक महामंडळाद्वारे वर्षातून किमान एकदा तरी तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली व्यवसायात्मक मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करावे. म्हणजेच लाभधारकांना व्यवसाय उभारणीकरिता येणा-या अडचणींना सामोरे जावे लागणार नाही.

१०. विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांना व्यवसाय उभारणीकरिता अत्यावश्यक असलेला वीजपुरवठा हा शासनाने खास बाब म्हणून मंजुरी देण्याची सूचना वीजमंडळास करावी.

११. शासनाने विकासात्मक महामंडळाद्वारे विशेषत: विधवा, परितक्त्या आणि निराधार महिलांकरिता स्वतंत्र प्रशिक्षण वर्ग निर्माण करून त्याद्वारे रेक्झीन वर्क, हस्तकला (मेहंदी, मोतीवर्क, जरदोशी इ.), गृहोद्योग (पापड, लोणची) , इमिटेशन ज्वेलरी मेकिंग आणि शिवणकाम इत्यादी विषयक कलाकौशल्याचे प्रशिक्षण हे महिलांना उपलब्ध करून दयावे. तसेच या महिलांकरिता विशेष योजना राबविण्यावरही अधिक भर द्यावा.

१२. समाजातील वाढत्या सुशिक्षित बेरोजगारांची संख्या पाहता आणि त्यांचे समाजातील दुष्परिणाम पाहता शासनाने अनुसूचित जाती जमातीकरीता निश्चित केलेल्या उत्पन्न मर्यादेत वाढ करावी. म्हणजेच या लोकसमुदायातील अधिकाधिक सुशिक्षित बेरोजगारांना या संधीचा लाभ उपलब्ध करून घेता येईल आणि या लोकसमुदायातील किमान अंशी का असेना पण बेरोजगारी ही कमी होण्यास मदत होईल.

१३. विकासात्मक महामंडळाच्या भागधारकांनी घेतलेल्या लाभाचे स्वरूप जनावरांच्या (गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या इ.) स्वरूपात असल्यास, दुदैवाने जनावरांमध्ये संसर्गजन्य रोगाची साथ पसरल्यास किंवा रोगाची लागण झाल्यास लाभधारकांला आर्थिक फटका सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांना वेळेवर हप्तेही भरता येत नाहीत. म्हणूनच शासनाने विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांनी लाभाच्या स्वरूपात घेतलेल्या जनावरांची तपासणी ही जिल्हयातील प्राथमिक पशुवैद्यकीय आरोग्य केंद्रामार्फत मोफत करून द्यावी.

१४. शासनाने विकासात्मक महामंडळाद्वारे जिल्हयातील किंवा शहरातील अथवा गावातील मध्यवर्ती ठिकाणी मोठ्या रक्कम (भांडवल) गुंतवणुकीचे गारमेंट शॉप, जनता बझार, इलेक्ट्रिकल शॉपी आणि फूड प्रॉडक्टस यासारखे मोठमोठे उद्योग उभा करावेत आणि लाभधारकांना स्वयंरोजरोजगाराबरोबरच रोजगारही उपलब्ध करून द्यावा. म्हणजेच विकासात्मक महामंडळाचे आर्थिक स्तर उंचविण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत मिळेल.

१५. शासनाने विकासात्मक महामंडळाद्वारे विशेषत: अपंग व निराधार लाभधारकांकरिता विशेष सवलतीतसह (अधिक रक्कमेचे अनुदान, अत्यल्प व्याजदर इ.) लाभ उपलब्ध करून द्यावा. तसेच त्यांच्याकरिता विशेष योजना राबविण्यावरही अधिक भर द्यावा.

१६. जिल्हयातील किंवा गावातील एकाच स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेच्या अधिकारक्षेत्रात जवळपासची अनेक गावे येतात. स्वाभाविकच त्या गावातील मागासवर्गीयांची संख्याही अधिक असते. त्यामुळे त्यांचा परिणाम लाभधारकांच्या लाभावर होतो म्हणूनच शासनाने लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित बँकाना किंवा बँक शाखांना लाभाचे उद्दिष्ट वाढवून देण्याचा अधिकार जिल्हयातील संबंधित जिल्हा समन्वय अधिका-यांना द्यावा. म्हणजेच गावातील अधिकाधिक लाभधारकांना याचा लाभ घेता येईल.

१७. ज्या गावामधील इतर समाजाच्या लोकांनी बँक कर्जाचा लाभ घेतला आहे आणि त्यांच्या थकित कर्जबाकीमुळे ते गाव थकित म्हणून ओळखले जात असल्याने साहजिकच त्याचा परिणाम मागासवर्गीय लाभधारकांच्या कर्ज प्रकरणावर होतो आहे. म्हणूनच शासनाने गरजवंत लाभधारकांना लाभ उपलब्ध करून देण्याकरिता योग्य निर्बंध (बँकेचे नियम, अटी) व्यतिरिक्त लाभ उपलब्ध करून देण्याचा अधिकार जिल्हयातील संबंधित बँक अधिका-यांना द्यावा.

१८. विकासात्मक महामंडळाच्या लाभधारकांनी व्यवसाय उभारणी केल्यास, दुर्दैवाने नैसर्गिक आपत्ती उद्‌भवल्यास, अपघात घडल्यास, व्यवसायाला जम न बसल्यास किंवा व्यवसाय बुडाल्यास लाभधारकांची अवस्था ही एक ना धड भाराभर चिंध्या अशी होते. अशावेळी मदतीचा हात म्हणूनच शासनाने लाभधारकांच्या वास्तविक परिस्थितीची पाहणी करून लाभधारकांना सवलत (व्याज दर, कर्ज परतफेड) द्यावी.

१९. विकासात्मक महामंडळाचा लाभ घेतलेल्या लाभधारकाला काही अपरिहार्य कारणाने कर्ज परतफेड करता येत नसल्यास किंवा त्यांची कुवत नसल्यास शासनाने विकासात्मक महामंडळाला जामीनदाराच्या संपत्तीतून संबंध्ति लाभधारकांच्या कर्जाची वसुली करण्याचा अधिकार द्यावा. म्हणजेच विकासात्मक महामंडळ हे तोट्यात चालणार नाही तर त्याचे कार्य गतिशीलरित्या होण्यास मदत होईल.

२०. विकासात्मक महामंडळामार्फत देण्यात येणा-या थेट कर्ज योजनेअंतर्गत किंवा रु. ५०,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या वसुलीकरिता शासनाने विकासात्मक महामंडळाना कायदेशीर अधिकार द्यावा. महामंडळाजवळ असलेल्या कायदेशीर वसुलीच्या अधिकाराचा अभाव, अत्यल्प व्याजदरामुळे लाभधारकांच्यातील बेफिकीरवृत्ती याचा परिणाम म्हणूनच महामंडळाच्या कर्मचा-यांनी वेळ व पैसा खर्च करून, वसुलीकरिता लाभधारकांचा सतत पाठपुरावा करूनही त्यांना समाधानकारकरित्या वसुली करता आली नाही. म्हणूनच विकासात्मक महामंडळाना दंड आकारण्याचा, संबंधित वस्तूच्या जप्तीचा असा कायदेशीर कार्यवाहीचा अधिकार प्राप्त व्हावा. जेणेकरून विकासात्मक महामंडळांना वसुली ही समाधानकारकरित्या करता येईल. लाभधारकांच्या बेफिकीरवृत्तीला पायबंद घालता येईल आणि महामंडळाना आपले कार्य अधिक गतिशीलरित्या करता येईल.

२१. शासनाने विकासात्मक महामंडळाच्या शेअर भांडवलामध्ये वाढ करून साधारणतः ही ४०० ते ५०० कोटीच्या दरम्यान करावी. म्हणजेच विकासात्मक महामंडळाच्या कार्याचा विस्तार होईल आणि विशिष्ट लोकसमुदायाच्या उन्नतीकरिता कार्यरत असलेल्या या विकासात्मक महामंडळामुळे त्या लोकसमुदायाचा सर्वांगीण विकास साधण्यास ख-या अर्थाने मदत होईल.